## यशदा धोरण परिपत्रक

| | |
|---|---|
| धोरण परिपत्रक क्रमांक व दि. | PPI-PC/२०१६-१ |
| दिनांक | ०१/०४/२०१६ |
| विषय | सन २०१६-१७ मध्ये सहकार प्रशिक्षण संशोधन केंद्राच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पुरस्कृत प्रशिक्षण कार्यक्रमांचे प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण शुल्क दर (निवासी/अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम) |
| संदर्भ | सन २०१६-१७ सीसीटीआर प्रशिक्षण कार्यक्रमासाठीच्या प्रशिक्षण सवलत योजनेस मा.महासंचालक यांची मंजुरी,यशदा धोरण परिपत्रक क्रमांक पीपीआय-पीसी/पीसी-२०१६-१ |
| परिपत्रक प्रति | राज्यातील सहकारी संस्थांसाठी (जिल्हा बँका /नागरी बँका /पतसंस्था/पगारदार पतसंस्था/अन्य सहकारी पतसंस्था) |
| कार्यान्वित दिनांक | दिनांक ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ |

यशदामधील राज्य ग्रामीण विकास संस्थेअंतर्गत सहकार प्रशिक्षण व संशोधक कक्ष (सीसीटीआर) यांचे वतीने राज्यातील सहकारी संस्थाच्या पदाधिकारी/अधिकारी यांचेसाठी व्यवस्थापन विकास विषयक (क्षमतावृद्धी) प्रशिक्षण कार्यक्रम आयोगीत केले जातात. प्रामुख्याने जिल्हा बँका,पतसंस्था,पगारदार पतसंस्था, तसेच अन्य सहकारी संस्था यांचे पदाधिकारी/अधिकारी सदर प्रशिक्षण कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. सदर प्रशिक्षण कार्यक्रम संस्था पुरस्कृत आहेत व त्यासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थी संख्येने उपस्थित प्रशिक्षणार्थी सवलतीचे शुल्क आकारले जाते.

सन २०१६-१७ या कालावधीमध्ये यशदामध्ये घेण्यात येणा-या अशा पुरूस्कृत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या प्रशिक्षणार्थीसाठी प्रतिदिन प्रति **प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण शुल्क सवलत योजना** खालील प्रमाणे राहील. सदर प्रशिक्षण शुल्क दरामध्ये शासकीय नियमानुसार १५% या दराने सेवाशुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र | प्रशिक्षण शुल्क तपशील | प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क |
|---|---|---|
| १ | एक प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या एक सहकारी संस्थेच्या एक किंवा दोन प्रशिक्षणार्थीसाठी (**प्रति** प्रशिक्षणार्थी **प्रतिदिन**) | रूपये- १६००/-<br>+ सेवाकर @१५% २४०/-<br>एकुण १८४०/- |
| २ | एक प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या एक सहकारी संस्थेच्या तीन किंवा तीन पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थीसाठी (**प्रति** प्रशिक्षणार्थी **प्रतिदिन**) | रूपये- १५००/-<br>+ सेवाकर @१५% २२५/-<br>एकुण १७२५/- |
| ३ | पुणे शहरातील सहकारी संस्थेच्या किंवा अन्य सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणार्थीसाठी अनिविासी व्यवस्था (प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिदिन)<br>(अनिविासी,फक्त दुपारचे एक जेवण व दोन चहा समाविष्ठ) | रूपये- १०००/-<br>+ सेवाकर @१५% १५०/-<br>एकुण ११५०/- |
| ४ | एक किंवा दोन दिवसाची कार्यशाळा( सार्वजनिक व इतर सुट्टीच्या दिवशी धरून)<br>निवासी-<br>अनिवासी- | रूपये- १८००/-<br>+ सेवाकर @१५% २७०/-<br>एकुण २०७०/-<br>रूपये- १२००/-<br>+ सेवाकर @१५% १८०/-<br>एकुण १३८०/- |
| ५ | बहिस्थ प्रशिक्षण कार्यक्रम | रूपये- १५००/-<br>+ सेवाकर @१५% २२५/-<br>एकुण १७२५/- |

वरील प्रशिक्षण शुल्क दिनांक ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत घेतला जाणा-या प्रशिक्षण कार्यक्रासाठी लागू राहतील.

(मा.महासंचालक,यशदा यांचे मान्यतेने)

निबंधक,यशदा

प्रत- माहितीस्तव व अवलोकनार्थ सादर

- मा.महासंचालक,यशदा
- मा.उपमहासंचालक,यशदा
- मा.वित्तिय सल्लागार,यशदा
- संचालक रा.गा.वि.सं,यशदा
- मा.लेखाधिकारी,यशदा
- सहकारी बँक/पतसंस्था (संबधित)